मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» शुक्रवार, दि. 12 जुलै 2024 | पान- 1


# शहरातील होर्डिंगवर येणार संक्रात

## होर्डिंगधारकांनी परवानगीपेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग उभारले : परवानगीपेक्षा मोठ्या आकाराच्या 390 होर्डिंगधारकांना नोटिस

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीत आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून होर्डिंगधारकांनी परवानगीपेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग उभारले आहेत. त्यातील परवानगीपेक्षा मोठ्या आकाराच्या ३९० होर्डिंगधारकांना नोटिस बजावल्या आहेत. परवानगीपेक्षा मोठे आकार तात्काळ कमी करावा, अन्यथा संपूर्ण होर्डिंग अनधिकृत गृहित धरून कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील होर्डिंगधारकांनी परवानगीपेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग कमी न केल्यास असे होर्डिंग संपूर्ण अनधिकृत गृहित धरून कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे अधिकृत होर्डिंगधारकांनी आपल्या होर्डिंगवरील कारवाई टाळण्यासाठी स्वतःहून वाढीव साईज कमी करावी, असे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले आहे. मे महिन्यात मुंबईतील घाटकोपर पाठोपाठ पिंपरी-चिंचवडमधील मोशीत होर्डिंग कोसळले होते. त्यानंतर, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी महापालिका हद्दीतील सर्व होर्डिंगचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने होर्डिंगचे सर्वेक्षण केले. त्यात २४ होर्डिंग अनधिकृत आढळले होते. त्याप्रकरणी होर्डिंगधारक, होर्डिंगवरील जाहिरातदार व जागामालक अशा ७२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. महापालिका अधिनियम आणि जाहिरात व फलक नियंत्रण नियमानुसार, खासगी जागेत होर्डिंग उभारण्यासाठी महापालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र, शहराचे सौंदर्य टिकवण्यासाठी



### होर्डिंग्जचा वाढीव आकार नको

» शहरात अनधिकृत होर्डिंग्ज आणि होर्डिंगचे जास्त आकार असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले. होर्डिंग्जचा वाढीव आकार कमी करण्याबाबत नोटिसा देण्यात येत आहेत. होर्डिंग्जचा आकार नियमानुसार बदलला नाही तर ते हटविण्यात येणार आहेत, अशी माहिती सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली.

> जाहिरातधारकाने महापालिकेच्या हद्दीमध्ये होर्डिंगवर जाहिरात करताना होर्डिंगधारकाने आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून रीतसर परवानगी घेतली आहे की नाही याची खातरजमा करावी. परवानगी घेतली नसल्यास संबंधित जाहिरातदार, जागामालक तसेच फलकधारकावर कायदेशीर कारवाई केली जाईल.
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> शहरात परवानगीपेक्षा मोठ्या आकाराचे ३९० होर्डिंग आढळले होते. या सर्वांना नोटिस देण्यात आल्या आहेत. नोटीस मिळताच यापैकी २३ होर्डिंगधारकांनी नियमानुसार होर्डिंगचा आकार कमी केला आहे. उर्वरित होर्डिंगधारकांना तात्काळ आकार कमी करावा. नियमांचे पालन करावे.
> - संदीप खोत, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग, महापालिका.

सर्व अनधिकृत होर्डिंग काढल्याची माहिती आकाशचिन्ह व परवाना विभागाने दिली आहे.

शहरात महापालिकेच्या जागेत जाहिरातफलक उभारले जातात. तसेच, खासगी जागा मालकांना जाहिरात फलक उभारण्यास परवानगी दिली जाते. हेच महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या उत्पन्नाचे साधन आहे. शहरात सध्यस्थितीत १ हजार १५१ अधिकृत होर्डिंग आहेत. तसेच परवानगीपेक्षा मोठ्या आकाराच्या ३९० होर्डिंगधारकांना नोटिस बजावल्या आहेत. नोटीस मिळताच यापैकी २३ होर्डिंगधारकांनी वाढीव होर्डिंगचा आकार

# पीसीयू मधील ॲनिमेशन शिक्षणाला जोड 'एनी' फिल्मची

## जागतिक स्तरावर ॲनिमेशन, व्हीएफएक्स, मल्टीमीडिया या क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर ॲनिमेशन, व्हीएफएक्स, मल्टीमीडिया या क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी आहेत. एनी फिल्म प्रा. लि. ने या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि एनी फिल्म प्रा. लि. यांच्यामधील सामंजस्य करारामुळे पीसीयुच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांना ॲनिमेशन मधील उच्च दर्जेदार आधुनिक तंत्रज्ञान अभ्यासण्याची संधी मिळाली असून त्याचा फायदा घ्यावा, असे मत एनी फिल्म प्रा. लि. चे संचालक निखिल हल्ली यांनी व्यक्त केले.

पीसीयू आणि एनी फिल्म प्रा. लि. यांच्या मध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी निखिल हल्ली बोलत होते. कार्यक्रमास उद्योजक तज्ज्ञ प्रतापराव पवार, आशियाई विद्यापीठ अध्यक्ष शिक्षण तज्ज्ञ डॉ. के. के. अग्रवाल, पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक तज्ज्ञ सचिन इटकर, प्रभारी कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे तसेच प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी हर्षवर्धन पाटील आणि निखिल हल्ली यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.



ॲनिमेशन, व्हीएफएक्स, मल्टीमीडिया क्षेत्रात एनी फिल्म प्रा. लि. चा मोठा वाटा आहे. पिंपरी चिंचवड विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास, वापर, उपयोग करता आला पाहिजे. येत्या काळातील ॲनिमेशन संधींचा विचार करून पीसीयू विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त विविध प्रकारचे अभ्यासक्रम सुरू करण्यावर भर देत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी पीसीईटी-पीसीयू नेहमीच आग्रही असते. याद्दष्टीने सामंजस्य करार करण्यात आला आहे असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

> व्हीएफएक्स आणि मल्टीमीडिया सायन्सेसमधील बी.एससी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरतील. पिंपरी चिंचवड विद्यापीठात मीडिया आणि कम्युनिकेशन स्टडीज; एनी फिल्म प्रा. लि. ॲनिमेशन, व्हीएफएक्स, मेटाव्हर्स, आणि गेमिंग शिक्षणातील निपुणतेसाठी ओळखले जाते, या गतिमान क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देणे हा उद्देश आहे.
> - हर्षवर्धन पाटील, कुलपती, पीसीयू.

> विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्याचे, त्यांना जागतिक ॲनिमेशन उद्योगात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्याने सुसज्ज करणे हे आहे.
> - निखिल हल्ली, एनी फिल्म प्रा. लि.

# पोलिसांची 1 हजार 684 मद्यपीं चालकांवर कारवाई

## वाहन परवाने निलंबित करण्याचा प्रस्ताव, वाहन परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहर परिसरात मद्यपी वाहनचालकांच्या बेदरकारपणामुळे गंभीर स्वरूपाच्या अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई (ड्रंक अँड ड्राइव्ह) तीव्र केली आहे. पोलिसांनी गेल्या दीड महिन्यांत आतापर्यंत १ हजार ६८४ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई केले असून त्यांचे वाहन परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येणार आहे.

कल्याणीनगर भागात (दि. १९ मे) भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणात अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध कारवाई केली होती. या अपघात प्रकरणानंतर पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई तीव्र केली.



### दीड महिन्यांत 12 कोटींचा दंड...

» शहर परिसरात वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई तीव्र करण्यात आली आहे. दि. २१ मे ते ८ जुलै या कालावधीत एक लाख ५८ हजार २६९ बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत १२ कोटी २१ लाख ९३ हजार ५५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. मद्य पिऊन वाहन चालविणे, भरधाव वाहन चालविणे, वाहन क्रमांक नसलेले वाहन चालविणे, ट्रिपल सीट, विरुद्ध दिशेने जाणे अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

> शहरात दि. १ जानेवारी ते दि. ३० जून या कालावधीत १६८४ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठविला आहे. परवाना निलंबितनंतर पुन्हा मद्य पिऊन वाहन चालविताना चालक आढळूल्यास परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात येणार आहे. तशी तरतूद कायद्यात आहे
> **- रोहिदास पवार, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

मद्य पिऊन वाहन चालविल्यास संबंधित वाहनचालकाचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाणार आहे. तात्पुरता परवाना निलंबित केल्यानंतर पुन्हा मद्य पिऊन वाहन चालविल्याचे आढळून आल्यास परवाना कायमस्वरुपी रद्द केला जाणार आहे. त्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाची मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली.

शहरात दिवसेंदिवस अपघातांच्या घटना वाढत असून, यामध्ये दारू पिऊन वाहन चालवून धडक दिल्याने बहुतांश घटनांची नोंद झाली आहे. त्यातच कल्याणीनगर येथील अपघात, नुकताच मद्यपी चालकाने भरधाव वेगात वाहन चालवून गस्तीवर असलेल्या पोलिसांना दिलेली धडक आणि एका मद्यपी चालकाने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर पेट्रोल ओतून त्यांना जाळण्याचा प्रयत्न केला होता.

त्यानंतर आता परवाने निलंबित करण्याच्या कारवाईला वेग आल्याचे दिसत आहे. पुणे शहरातील वाहनचालकांनी नियम पाळावेत यासाठी वाहतूक शाखेकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये होणाऱ्या अपघातांवर अंकुश लावण्याकरिता नाकाबंदी केली होती.

दारू पिऊन गाडी चालवल्यास चालकाला पहिल्या वेळेस १० हजार रूपये दंड भरावा लागतो. दुसऱ्यांदा असा गुन्हा घडल्यास २० रुपये दंड भरावा लागतो. काही प्रकरणामध्ये तुरुंगवास देखील भोगावा लागू शकतो.

# महापालिकेत समाविष्ट 34 गावांची ‘वाट’ बिकट

## 2017 ते 2024 या कालावधीत तब्बल 132 कोटी रूपयांची तरतूद ,मात्र केवळ 42 कोटींचा निधीच खर्ची पडला

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत २०१७ मध्ये ११ तर २०२१ मध्ये २३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या ३४ गावांमधील रस्ते विकसित करण्यासाठी २०१७ ते २०२४ या कालावधीत तब्बल १३२ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. मात्र, महापालिका प्रशासनाच्या उदासिनतेमुळे यामधील केवळ ४२ कोटींचा निधीच खर्ची पडला असून उर्वरीत निधी वाया गेला आहे.

गावांच्या विकास आराखड्यास होणारा उशीर, रस्ते करण्यापूर्वी पाणीपुरवठा तसेच ड्रेनेज वाहिन्यांचे जाळे टाकण्याबाबत कोणतेही नियोजन महापालिकेच्या पातळीवर न झाल्याने रस्त्यांसाठींचा निधी फक्त कागदावरच राहिल्याचे चित्र आहे.



या गावांमधून केवळ शहरात येणारे मुख्य रस्तेच दुरूस्त झाले आहेत. अंतर्गत रस्ते कागदावरच आहेत. परिणामी, या गावांमधील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे पथ विभाग दरवर्षी ही रस्त्यांची रक्कम इतर कामांसाठी वर्गीकरणाद्वारे वळवित आहे.

या गावांमधील रस्ते न करण्यामागे महापालिकेकडून सेवावाहिन्यांचे कारण दिले जात आहे. गावांमध्ये महापालिका ड्रेनेज तसेच पाण्याच्या जलवाहिन्या टाकणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### डीपी आणि आरपीचे कारण...

» महापालिकेत २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांचा विकास आराखडा अद्यापही झालेला नाही. तर, २३ गावांचा आराखडा तयार करण्याचे काम पीएमआरडीएकडे सुरू आहे. रस्ते न करण्यामागे सेवावाहिन्यांचे कारण दिले जात आहे. पाण्याच्या जलवाहिन्या टाकणार असल्याचे सांगण्यात येत आहे अनेक रस्त्यांचे रूंदीकरण प्रस्तावित आहे. सध्याचे रस्ते जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक योजनेनुसार (आरपी) नुसार आहेत. त्यामुळे गावांसाठी निधी असला तरी पालिकेकडून डीपी आणि आरपीचे कारण देत हे रस्ते विकसित केले जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे, मध्यम मार्ग काढत पालिकेने रस्ते केले असले तरी डीपी अंतीम होईपर्यंत नागरिकांना तत्पुरता दिलासा मिळाला असता मात्र, प्रशासनाची मानसिकता नसल्याने नागरिक तसेच लोकप्रतिनिधींनाही उडवाउडीची उत्तरे देत या समस्येकडे दूर्लक्ष केले आहे.

त्यासाठी, खोदाई करावी लागणार असल्याचे सांगत अंदाजपत्रकात निधी असतानाही पथविभाग तात्पुरती डागडूजीही करत नसल्याचे चित्र आहे. मात्र, प्रत्यक्षात पालिकेच्या ड्रेनेज व समान पाणी योजना पूर्ण होण्यास जवळपास २०३० उजाडणार आहे. त्यामुळे, महापालिका तोपर्यंत समाविष्ट गावांतील रस्ते करणार नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.

# महापालिकेच्या वतीने रेबीज विरोधी पथकाची स्थापना

## येत्या काही वर्षात रेबीजमुक्त शहर करण्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उद्दिष्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राच्या वतीने रेबीज निर्मुलनासाठी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहराला रेबीजमुक्त शहर करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रेबीज विरोधी पथकाची स्थापना केली आहे. या पथकामध्ये पशुवैद्यकीय डॉक्टर, पशुधन पर्यवेक्षक, श्वान पकडणारे आणि मदतनीस यांचा समावेश असून पथकाला विशेष डॉग व्हॅन आणि वैद्यकीय कामकाजासाठी वैद्यकीय वाहन देण्यात आले आहे.



महापालिकेच्या वतीने रेबीज विरोधी पथकाची स्थापना मे महिन्यात करण्यात आली होती. मे महिन्यापासून या पथकाने विविध भागात १२०० पेक्षा जास्त श्वानांचे लसीकरण केले असून विशेषतः कुत्रा चावण्याच्या घटना घडलेल्या परिसरांवर लक्ष केंद्रित केले आहे. याव्यतिरिक्त, कॅनाइन कंट्रोल ऍन्ड केअर संस्थेच्या मदतीने नसबंदी केंद्रात सुमारे ६०० श्वानांचे अँटी-रेबीज लसीकरण करण्यात आले आहे. रेबीजला शहरातून हद्दपार करण्यासाठी एकाच वेळी नसबंदी आणि लसीकरणावर भर देण्यात आला आहे, ज्याचे उद्दिष्ट नागरी मर्यादित ७० टक्के कळप प्रतिकारशक्ती (हर्ड इम्युनिटी) वाढविण्याचे आहे.

येत्या काही वर्षात रेबीजमुक्त शहर बनवण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. या रेबीज विरोधी पथकाची निर्मिती आणि स्वयंसेवकांचे एकत्रित प्रयत्न हे महत्त्वाकांक्षी लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने एक महत्वपुर्ण पाऊल आहे. गरज पडल्यास येत्या काही दिवसांत रेबीज विरोधी पथकांची संख्या वाढविण्यावर महापालिका भर देणार आहे. तसेच या उपक्रमाला असंख्य पशु स्वयंसेवकांकडून पाठिंबा मिळाला असून त्यांनी लसीकरण मोहिमेमध्ये महापालिकेस मोलाचे सहकार्य केले आहे. स्थानिक प्राणी कल्याण संस्थांच्या सहकार्यही पथकांना लाभत असून रेबीज प्रतिबंध आणि पाळीव प्राणी मालकीबद्दल लोकांनी पार पाडण्याच्या जबाबदारीबद्दल माहिती देण्यासाठी जागरूकता मोहीम देखील महापालिका क्षेत्रात राबविली जात आहे.

### रेबीज प्रतिबंधात्मक उपक्रमातील ठळक मुद्दे

- समर्पित रेबीज विरोधी पथक
- पशुवैद्यकीय डॉक्टर
- पशुधन पर्यवेक्षक
- श्वान पकडणारे आणि मदतनीस पथकासोबत वाहने
- विशेष डॉग व्हॅन
- वैद्यकीय व्हॅन

**लसीकरण मोहीम (मे पासून)**

विविध परिसरातील १२०० श्वानांचे लसीकरण – नसबंदी केंद्रांमध्ये ६०० श्वानांचे लसीकरण

**सहयोगी संस्था**

कॅनाइन कंट्रोल ऍन्ड केअर, स्थानिक प्राणी कल्याण संस्था

**पथकाचे मुख्य उद्दिष्ट**

कुत्रा चावण्याच्या घटना नोंदविलेल्या परिसरांना केंद्रित करणे

७०% कळप प्रतिकारशक्ती (हर्ड इम्युनिटी) निर्माण करणे

**सामुदायिक प्रतिबद्धता**

विविध ठिकाणी डेंग्यू जनजागृती मोहीम

# डासांच्या अळ्या आढळणाऱ्या जागामालकांना दंड

## बांधकामे, घरे, दुकाने तपासणी करून डासोत्पत्ती स्थळ नष्ट करण्याचे पिंपरी-चिंचवड पालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

डेंग्यू किंवा किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांची तपासणी करून डासोत्पत्ती स्थळ तात्काळ नष्ट करावीत. तसेच डासांच्या अळ्या आढळलेल्या ठिकाणांच्या जागा मालकांवर आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या तसेच करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी अभयचंद्र दादेवार, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, अमित पंडित, अजिंक्य येळे, डॉ. अंकुश जाधव, सिताराम बहुरे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे तसेच वैद्यकीय अधिकारी आणि संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. महापालिका क्षेत्रातील खाजगी शाळा, महाविद्यालये, बांधकामाची ठिकाणे, विविध खाजगी दवाखाने व रुग्णालये, झोपडपट्टी व झोपडपट्टी सदृश ठिकाणे, प्रशासकीय कार्यालये, नागरी आरोग्य केंद्रे इत्यादी ठिकाणी डेंग्यू किंवा किटकजन्य आजार याबाबत जनजागृती करण्यात यावी.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय डेंग्यू प्रतिबंधात्मक मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी पथकांमार्फत खाजगी आस्थापना, बांधकामे, मोकळी मैदाने, शहरातील विविध उद्याने, भंगाराची किंवा इतर मोठी दुकाने, हॉटेल्स, रेस्टॉरंट यांची पाहणी करून डासोत्पत्ती ठिकाणे आढळलेल्या ठिकाणी संबंधितांवर दंडात्मक कारवाई करा. लोकप्रतिनिधी, शहरातील कलाकार, प्रसिद्ध खेळाडू यांना डेंग्यू जनजागृती कृती आराखड्यामध्ये सामिल करून घेऊन चित्रफिती तयार करून महापालिकेच्या अधिकृत सोशल मिडीया हॅन्डलद्वारे जनजागृती करा, ठिकठिकाणी डेंग्यू प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देण्यासाठी पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, पॅम्प्लेट वितरित करा, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिल्या.

### नागरिकांमध्ये जनजागृती करा

**शहरातील डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधक मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, नागरिकांच्या घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण करणे, व्यवसायाच्या ठिकाणी वेळोवेळी पाहणी करणे यांसारख्या उपाययोजना राबवण्यात याव्यात. घराच्या आत आणि बाहेर स्वच्छ पाण्याने भरलेल्या कंटेनरमध्ये डासांची उत्पत्ती होत असते, शिवाय घरातील फ्लॉवर-पॉट, मनी प्लांट्स आणि फ्रीज ड्रिप पॅनमधील पाण्यात देखील अशी उत्पत्ती आढळून येते. यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सोशल मिडीयाच्या माध्यमातून किंवा इतर प्रसारमाध्यमांद्वारे शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात यावी.**

> डेंग्यू जनजागृती कृती आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यामध्ये साप्ताहिकदृष्ट्या करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमध्ये सर्व महापालिका आणि खाजगी रुग्णालयांमध्ये जनजागृती उपक्रम, रूग्णालयाच्या बाहेर आणि आतील भागातील स्थळांची पाहणी करणे, पॅम्फ्लेट वाटप, व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका, सर्व सरकारी आणि खासगी कार्यालयांमध्ये जनजागृती, जनजागृतीबाबत पथनाट्ये, शिबीराचे आयोजन, सर्व सरकारी आणि खाजगी शाळांमध्ये जनजागृती उपक्रम, डेंग्यू जागरूकता व्हीडीओ/ऑडिओ क्लिप, प्रजनन स्थळांची तपासणी, पॅम्फ्लेट वाटप, पोस्टर स्पर्धा, व्याख्याने, शालेय रॅली तसेच गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक मंच, यांचा उपक्रमात सहभाग या उपाययोजनांचा समावेश होता.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे , आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महापालिका.**

# आठ हजार पुणेकरांकडे श्वान परवाना!

## प्रत्यक्षात महापालिका हद्दीत लाखांपेक्षा अधिक पाळीव श्वान, अँटी रेबिज, नसबंदीचा अभाव





> पुणे शहरात केवळ आठ हजारजणांनी आपल्या पाळीव कुत्र्यांसाठी परवाना घेतला आहे. ३२२ पाळीव मांजरासाठी परवाना घेतला आहे. प्रत्यक्षात शहरात पाळीव कुत्र्यांची संख्या लाखांपेक्षा अधिक आहे. नागरिकांनी आपला पाळीव कुत्रा परवाना घ्यावा, त्यासाठी प्रति वर्षे पन्नास रूपये तर एक रक्कमी पाचशे रूपये दहा वर्षांसाठी शुल्क आहे.
>
> **- डॉ. सारिका फुंडे, मुख्य पशू वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महापालिका.**

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात प्रत्यक्षात लाखापेक्षा अधिक पाळीव श्वान असण्याची शक्यता आहे. मात्र, यातील फक्त आठ हजार नागरिकांनी आपल्या पाळीव कुत्र्यांसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच परवाना घेतला आहे. तसेच ३२२ नागरिकांनी पाळीव मांजरासाठी परवाना घेतला आहे.

पाळीव कुत्रा किंवा मांजरासाठी वर्षाला फक्त पन्नास रूपये शुल्क असूनही अनेकजण परवाना घेत नाहीत. त्यामुळे पाळीव कुत्र्यांना किंवा मांजरांना अँटीरेबीज आणि नसबंदी करता येत नसल्याची माहिती महापालिका आरोग्य विभागाचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या नवीन नियमावलीनुसार कुत्रा पाळण्यासाठी परवाना आवश्यक आहे. देशातील गुरूग्राम, लखनौ, इंदूर, बेंगळुरू, गाझियाबाद आणि पुणे शहरासाठी हा नियम केला आहे. पाळीव प्राण्यांची नोंदणी ऑनलाईन प्रक्रिया आहे. पाळीव कुत्र्यांचे प्रमाणपत्र ( जेथून कुत्रा खरेदी केले होते) जातीचा प्रकार , पशु वैद्यकीय आणि लसीकरण तपशील अपलोड करणे आवश्यक आहे. यासह पशु वैद्यकीय डॉक्टरांकडून रेबीज इंजेक्शन प्रमाणपत्र, नसबंदी आणि लसीकरण सादर करणे आवश्यक आहे.

नोंदणी नंतर एक धातूचा टोकन क्रमांक दिला जातो. तो कुत्र्याच्या गळ्यातील कॉलरवर असतो. यासाठी पाचशे रूपये दहा वर्षांसाठी नोंदणी शुल्क आहे. देशातील काही राज्यात उदाहरणार्थ हरियाणात या धातूच्या टोकनशिवाय कुत्रा आढळल्यास कुत्र्याला महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी घेऊन जातात. मालकाला दररोज ५० रूपये दंड भरावा लागतो.

नोएडा शहरात १ मार्च २०२३ पासून मालकांनी त्यांच्या पाळीव प्राण्यांचे लसीकरण आणि निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण किंवा नसबंदी करण्यासाठी उशीर झाल्यास दोन हजार महिना दंड आकारला जातो. पाळीव कुत्री सार्वजनिक ठिकाणी शौच करत असतील तर त्यांची साफ सफाई करण्याची जबाबदारी मालकाची असते. पाळीव प्राण्याने एखाद्याला इजा केल्यास संबंधित मालकाला दहा हजार दंड आकारला जातो. यासह जखमी व्यक्ती किंवा प्राण्यांच्या उपचाराचा खर्चही मालक देतील असा नियम आहे.

हरियाणा सरकारने राज्यात कुत्र्यांचे परवाने किंवा नोंदणी अनिवार्य केली आहे. कुत्र्यांचे हल्ले किंवा चावण्याच्या संख्येत वाढ झाल्यामुळे हरियाणा सरकारने कुत्र्यांसाठी डॉक्टर परवाना घेणे अनिवार्य केले आहे. नविन नियमांमध्ये प्रति मालक एकच कुत्रा पाळणे समाविष्ट केले आहे. शिवाय हल्ला किंवा चावण्यापासून रोखण्यासाठी मालकांनी कुत्र्याच्या तोंडाला मास्क लावले पाहिजे असा नियम केला गेला आहे. त्यामुळे नोएडा आणि हरियाणाप्रमाणे कडक नियम पुणे शहरातील पाळीव प्राण्यांसाठी, मालकांसाठी होऊ शकतात, असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

# 'ब्लॅक स्पॉट'वर तात्पुरती मलमपट्टी!

## उच्चस्तरीय समिती स्थापन करून चार आठवड्यात रोड मॅप तयार करण्यास बजावले : याचिकेवरील पुढील सुनावणी 14 ऑगस्ट रोजी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील २३ ठिकाणांवर साक्षात यमराज दबा धरून बसला आहे. महापालिकेच्या उदासीन कारभारामुळे काही ठराविक ठिकाणांवर ('ब्लॅक स्पॉट') वारंवार अपघात घडत आहेत. त्यांची जंत्री पुणे पोलिसांनी तयार केली असून त्याठिकाणी झालेल्या गंभीर अपघातांच्या संख्येसह ही यादी महापालिकेला पाठविण्यात आली आहे. याठिकाणी उपाययोजना करून अपघात, वाहतूक कोंडी निर्मूलनासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचना पोलिसांनी केल्या आहेत. मात्र पालिकेच्या पथ विभागाने 'ब्लॅक स्पॉट'वर कायम स्वरुपी उपाय योजना करण्याऐवजी केवळ तात्पुरती मलमपट्टी करत रंगोरंगोटीची कामे केली आहेत. त्यानंतर अपघात कमी होणे अपेक्षित होते, मात्र अपघातांची मालिका सुरुच असून अनेकांना जीव गमवावा लागत आहे.

महापालिका हद्दीत २३ ठिकाणी तर जिल्ह्यात ३९ ठिकाणी वांरवार अपघात होत आहेत. त्यामुळे यावर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी पोलिसांनी यादी दिली होती. त्यानंतर पालिकेच्या पथ विभागाने सर्व्हेक्षण केले आहे. त्यातून तात्पुरते उपाय आणि कायमस्वरुपी उपाय ठरविले आहेत. तात्पुरत्या उपाय योजनांमध्ये रंगरंगोटी, साईड पट्टे मारणे, दिशा दर्शक फलक बसविणे, धोकादायक ठिकाणांची माहिती सांगणे अशी कामे ठरविली होती. ही कामे पूर्ण केली आहेत.



परंतु पोलिसांच्या सूचनेनुसार कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी नियोजन केलेले नाही. कायमस्वरुपी उपायासाठी वाहनांची वर्दळ, कोणत्या वेळेला गर्दी, वाहतुकीचे स्वरुप आदी बाबींचा अभ्यास पथ विभाग करत आहे. त्यानंतर कायम स्वरुपी उपाय केले जाणार आहेत. तसेच ब्लॅक स्पॉट बंद करण्याचे काम सुरु होईल. त्याची निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम सुरु आहे, असे पथ विभागाने सांगितले.

मुंबई-बंगळुरू महामार्गावरील नवले पूलाजवळ सर्वाधिक अपघात घडले आहेत. त्या खालोखाल लोणी काळभोर आणि विमानतळ परिसराचा समावेश आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२० ते २०२३ या काळातील अपघातांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. संबंधित 'ब्लॅक स्पॉट'च्या ५०० मीटर क्षेत्रामध्ये मागील तीन वर्षात घडलेल्या प्राणांतिक अपघातांची आकडेवारी काढण्यात आली आहे. या काळात सलग पाच प्राणांतिक अपघात किंवा गंभीर अपघात घडलेले असतील, तसेच एकूण १० व्यक्ती (एका पेक्षा अधिक अपघात मिळून) मृत्यूमुखी पडलेल्या असतील अशा ठिकाणांची यादी तयार करण्यात आली आहे. यादीमध्ये भारती विद्यापीठ, कात्रज चौक, भारती विद्यापीठ, दरी पुल, भारती विद्यापीठ, नविन कात्रज बोगदा, वारजे माळवाडी- माई मंगेशकर हॉस्पीटल, वारजे माळवाडी- मुठा नदी पुल, वारजे माळवाडी - डुक्कर खिंड, सिंहगड रोड- नवले पुल, सिंहगड रोड - सेल्फी पॉईट, हडपसर - आयबीएम कंपनी, हडपसर - रविदर्शन चौक, लोणी काळभोर -कदमवाक वस्ती, लोणी काळभोर - लोणी स्टेशन चौक, लोणी काळभोर - थेऊर फाटा चौक, लोणी काळभोर - पालखी विसावा वडकी, चंदननगर - खराडी बायपास चौक, चंदननगर - रिलायंस मार्ट, विमानतळ - खराडी जकात नाका, विमानतळ - टाटा गार्डरुम चौक, विमानतळ - विमाननगर चौक, विमानतळ - ५०९ चौक, मुंढवा - मुंढवा रेल्वे पूल या ठिकाणांचा समावेश आहे.

अपघातप्रवण म्हणून निष्पन्न झालेल्या २३ ठिकाणांची नव्याने निश्चिती केली आहे. ही यादी वाहतुक पोलीस शाखेकडून महापालिकेला पाठविली आहे.